दैनिक
# लोकशाही मतदार
RNI-NO-MAHMAR/2023/87967
संपादक - अक्षय हणमंत बबलाद
DAILY LOKSHAHI MATDAR
Email - lokshahimatdar@gmail.com
क ६४ | बुधवार ७ ऑगस्ट २०२४ | मराठी दैनिक | सोलापूर | RNI-NO-MAHMAR/2023/87967 | पाने:१

# सोलापूर विद्यापीठात क्वीक हिल सायबर क्लबचे उदघाटन

दैनिक लोकशाही मतदार



**सोलापूर**-पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व क्वीक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ह्यसायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षाह्न हा उपक्रम राबविला जातो. या अंतर्गत विद्यापीठात सायबर क्लबचे उदघाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली व क्विक हिल फाऊंडेशनच्या प्रमुख अनुपमा काटकर यांच्या उपस्थितीतउपस्थितीत करण्यात आले.या उपक्रमाच्दारे समाजातील विविध घटकामध्ये सायबर गुन्हेविषयी माहिती दिली जाते. तसेच अशा प्रकारचे गुन्हे टाळण्यासाठी विविध उपाययोजना सेमीनारच्दारे सांगितले जाते. जसे की ओटीपी कोणास सांगु नये, स्ट्रॉग पासवर्ड वापरावा, सोशल मिडीयावर आलेले मेसेजेस व लींकची शहानिशा करावी व आपली माहिती, ही आपली जबाबदारी असे सांगितले जाते.क्वीक हिल फाऊंडेशनने या वर्षी हा उपक्रम राबविण्यासाठी संकुलातील ३० विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड केली आहे. तसेच ४ विद्यार्थ्यांची सायबर क्लब ऑफीसर्स म्हणून निवड केली आहे. या सायबर क्लबमध्ये कु. मालती जाधव (प्रेसीडेंन्ट), कु. सायली शेळके (सेक्रेटरी) कु. शकुंतला बेळ्ळे (Community Director) व कु. सुप्रीया शिंदे (PR/ Media Director) यांची निवड केली आहे. आजच्या डिजीटल युगात समाजामध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करणे हि काळाची गरज आहे व त्यासाठी विद्यापीठातील सायबर वॉरियर्स प्रयत्न करतील असे कुलगुरू प्रा.महानवर यांनी आपल्या भाषणात म्हणाले. या उपक्रमाच्दारे सायबर वॉरियर्समध्ये व्यक्तीमत्वाचा विकास व संभाषण कौशल्यमध्ये सुधारणा होऊ शकते, असे मत क्विक हिल फाऊंडेशनचे अजय शिर्के यांनी मांडले. काटकर यांनी क्विक हिल या अँटी व्हायरस कंपनीची माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संकुलाचे संचालक प्रा. वि.बी. घुटे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. या कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, डॉ. आर. एस. मेंते, डॉ.ए. आर. शिंदे, डॉ. एस. डी. राऊत, डॉ. जे. डी. माशाळे, सी.जी. गार्डी तसेच डॉ. ए.एस. साखरे, संदीप घोटे, सुधीर वाघमारे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कांचन निकंबे व सयी आवताडे यांनी केले.